# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 119/2022 दिनांक : 22.03.2022

## 1)जबरी चोरी :–

**1)अर्धापुर** :–दिनांक 15.03.2022 रोजी चे 07.55 वा. चे सुमारास, **भोकर फाटा येथील साईबाबा मंदीराच्या समोरील बाजुस सार्वजनिक रोडवर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व तीचे पती असे दोघे मिळुन मो सा वर बसुन नांदेड येथुन भोकरकडे जात असतांना भोकर फाटा येथील साईबाबा मंदीराच्या समोरील रोडवर आले असता एका अज्ञात चोरटयांने त्यांचे मो सा जवळ येवुन फिर्यादीचे पाठीमागे बसलेल्या पत्नीचे हातातील पर्स ज्यामध्ये सोन्याचे शॉर्ट गंठण, नगदी रूपये व एमआय कंपणीचा मोबाईल असा एकुण 52,937/–रूपयाचा माल जबरीने हिसकावुन चोरून घेवुन पळुन गेला. वगैरे **फिर्यादी लक्ष्मीबाई विश्वनाथ देवकर, वय 40 वर्षे, व्यवसाय नौकरी शिक्षीका रा. गांधी चौक ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 72/2022 कलम 394, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री आगलावे**, **मो.क्रं. 9767777884** हे करीत आहेत.

**2)भोकर** :–दिनांक 20.03.2022 रोजी चे 23.30 वा. चे सुमारास, **पिंपळढव पुलावर म्हैसा रोडवर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा भाडयाने घेवुन बेलतरोड कडे जात असतांना पिंपळढव पुलावर म्हैसा रोडवर त्याचे ऑटोस पाठीमागुन आलेल्या लाल रंगाच्या बिना नंबर प्लेटच्या पल्सर मो सा वरील अज्ञात तीन चोरटयांनी संगणमत करून ऑटोच्या समोर मो सा आडवी लावुन फिर्यादी व त्याचे साथीदारास धक्काबुक्की करून व लाथा मारून त्याचे जवळील दोन मोबाईल व नगदी असा एकुण 9700/–रूपयाचा माल जबरीने हिसकावुन चोरून पळुन गेले. वगैरे **फिर्यादी शेख इरफान शेख मुख्तार अहेमद, वय 37 वर्षे, व्यवसाय ॲटोचालक रा. विशालनगर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 98/2022 कलम 392 34, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री पाटील**, **मो.क्रं. 9850550670** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**1)भाग्यनगर** :–दिनांक 12.03.2022 रोजी चे 21.00 ते दिनांक 13.03.2022 रोजी चे 07.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरा समोर जिल्हा परीषद कॉलनी मालेगाव रोड नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा भाऊ त्यांची हिरो होंडा स्प्लेडंर कंपणची काळया रंगाची मो सा क्रं. एमएच–26/एल–5667 किंमती 15,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी प्रणिता नारायण यन्नावार, वय 42 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. जिल्हा परिषद कॉलनी मालेगाव रोड नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 99/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/926 कळणे, मो.क्र. 9923027926** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**भोकर** :–दिनांक 20.03.2022 रोजी चे 08.30 वा. दि. 21.03.2022 चे 15.00 वा. चे दरम्यान, **भोकर ते मुदखेड रोडवरील पाण्याचे टाकी जवळ ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील कोणीतरी अज्ञात इसमाने भोकर ते मुदखेड रोडवरील पाण्याचे टाकी जवळ दोन्ही रोडच्या बाजुने स्ट्रक्चर उभे करण्यासाठी वीस मीटर 33 केव्ही लाईनचे येणारे जाणारे अल्युमिनियम व कॉपर वायर एकुण आठ नग किंमती अंदाजे तीन लाख रूपयाचे वायर कापुन चोरून नेले. वगैरे **फिर्यादी शेख रफिक शेख युनूस, वय 27 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. भानखेडा ता. शेनगाव जि. हिंगोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 101/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास** सपोउपनि/**श्री कराड**, **मो.क्र. 9552500358** हे करीत आहेत.

# 4)विवाहीतेचा छळ :–

**उमरी :–** दिनांक 07.06.2018 ते दि. 28.03.2019 वा. चे दरम्यान, **मौजे सिंधी ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी बाईस 407 टेम्पो आणि इतर कामासाठी दहा लाख रूपये माहेरहुन आण असे म्हणुन शारिरीक व मानसीक छळ करून शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 22 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 76/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/465 सवयी, मो.क्रं. 9689202996** हे करीत आहेत.

# 5)अपघात :–

**1)सिंदखेड :–** दिनांक 20.03.2022 रोजी चे 20.00 वा. चे सुमारास, **बामणगुडा फाटा ते चिंचखेड जाणारे रोडवर ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे जंगुदेव जनकराव कुमरे, वय 25 वर्षे, रा. पाथरी ता. किनवट जि. नांदेड** हा व जखमी असे आपल्या ताब्यातील मो सा क्रं एमएच–21/ई–7503 ही चालवत सिंदखेड कडुन चिंचखेड कडे जात असताना यातील आरोपी रोडचे काम घेणारा गुत्तेदार हा पुलाचे काम करण्यासाठी खड्डा खोदला परंतु रोड सुरक्षा साठी कोणत्याही प्रकारे सुचना फलक व संरक्षण लावले नाही त्यामुळे यातील मयत हा मो सा सह खडयात पडल्याने जागीर मरण पावला व यातील करम कनाके हा गंभीर जखमी झाला. वगैरे **फिर्यादी मारोती रामजी गेडाम, वय 50 वर्षे, व्यवसाय शेत मजुरी रा. पाथरी ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं. 39/2022 कलम 279, 337, 304(अ), भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री भोपळे, मो.क्र. 9423926150** हे करीत आहेत.

# 6)फसवणुक :–

**1)मुखेड :–** दिनांक 03.10.2020 ते दि. 03.01.2021 चे दरम्यान, **प्रॉपर मुखेड ता. मुखेड जि.नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस डीईएनएन आयएमआय एनएन या कपडयाची कंपणीची एजेन्सी देतो म्हणुन वारंवार फिर्यादीकडुन एकुण 13,71,000/–रूपये घेवुन फिर्यादीस कपडयाची एजन्सी न देता फिर्यादीची फसवणुक केली. फिर्यादीने पैसे परत मागीतले असता फिर्यादीस शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी तुकाराम पि. मारोती भत्ते, वय 33 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. चिटमोगरा पो. टाकळी ता. बिलोली जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरन 86/2022 कलम 420, 471, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री काळे, मो.नं. 9850072078** हे करीत आहेत.

# 7)विश्वासघात :–

**1)विमानतळ :–** दिनांक 24.02.2022 रोजी चे 17.45 वा. चे सुमारास, **आशिर्वादनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे घराकडे जात असतांना एक अनोळखी इसम हे फिर्यादीस म्हणाले की तुमच्या मुलाने तुमच्या साठी अंगठीची ऑर्डर दिली आहे. तुम्ही माझ्या सोबत चला बोटाचे माप घ्यायचे आहे. माझे घर बाजुला आहे. असे सांगीतल्याने फिर्यादी हा त्यांचे सोबत थोडे समोर त्यांचे निळया रंगाचे स्कुटीवर गेला तेव्हा आरोपी म्हणाला की तुम्ही ईथे थांबा मि माप घेवुन येतो म्हणुन फिर्यादीची अंगठी घेवुन गेले ते परत आलेच नाही. अनोळखी इसमाने फिर्यादीस खोटे बोलुन फिर्यादीची पाच ग्रॅमची अंगठी किंमती 20,000/–रूपयाची घेवुन जावुन विश्वासघात केला. वगैरे **फिर्यादी अशोक तुकाराम भगत, वय 68 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त रा. सुर्यदयनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 99/2022 कलम 406 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1334 जाधव, मो.नं. 9923078806** हे करीत आहेत.

# 8)जुगार :–

**लोहा :–** दिनांक 21.03.2022 रोजी चे 13.50 वा. चे सुमारास, **लोहा ते गंगाखेड जाणारे रोडवर समर्थ टी हाऊसचे बाजुस लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 9400/–रुपये एक विवो कंपणीचा मोबाईल किंमती 6000/–रूपयाचा असा एकुण 15,400/–रूपयाचे व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोह/408 अशोक माधवराव केंद्रे, ने. पोस्टे लोहा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 62/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1754, मो.क्र. 9923030407** हे करीत आहेत.

## 9)विद्युत शॉक लागुन मृत्यु :—

**भोकर :—**दिनांक 21.03.2022 रोजी चे 06.00 वा. चे पुर्वी, **मयताचे वर्कशॉप येथे हाडको ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे मंजितसिंग रतनसिंग टर्नर, वय 38 वर्षे, रा. विठ्ठल नगर हाडको नांदेड**, हा त्याचे वर्कशॉपचे दुकानात वेल्डींगचे काम करीत असतांना विद्युत शॉक लागुन जागीच मरण पावला. वगैरे **खबर देणार गुरूबचनसिंग, टहेलसिंग सिध्दु, वय 27 वर्षे, रा. शिवशाही नगर तरोडा बु. चैतन्यनगर रोड नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे भोकर** आ. मृ. 27/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2168 मो.नं. 8999978576** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड